**सरकारपक्षा तर्फे शपथेवर साक्षीदार क्रमांक ०१ यांची पुढील**

**उलटतपासणी आरोपी क्रमांक १ तर्फे ॲड.पी.बी.राख**

०९. हे म्हणणे खरे आहे की घटनेच्या वेळी कोव्हीड आजाराचे प्रादुर्भावामुळे सर्वत्र लॉकडाउन लागले होते. हे म्हणणे खरे आहे की माझा पुणे येथील मुलगा गणेश हा सुध्दा लॉकडाउन मध्ये गावी आला होता. हे म्हणणे खरे आहे की घटनेच्या दिवशी मी माझे खोलीमध्ये झोपलो होतो व माझी पत्नी व गणेश हे गच्चीवर झोपले होते. हे म्हणणे खरे आहे की माझे रुमच्या पाठीमागील बाजुला अनिलच्या दोन खोल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की घटनेची जागा ही माझे खोलीपासुन दोन ते तीन फुटापर्यंत आहे.

१०. हे म्हणणे खरे आहे की आता मला दाखविण्यात आलेल्या आर्टीकल 'ए' आणि 'सी' या फोटोमध्ये अनिल सेप्रेट दोरीला लटकलेले दिसते. आरोपीचे विधीज्ञांनी सदर फोटो उलटतपासणीमध्ये साक्षीदारास दाखवुन त्याकडे लक्ष वेधल्यामुळे सदर फोटोस निशाणी क्र.**४३ व ४४** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की सदर फोटोमध्ये एक दोरी व केबल वायर दिसत आहे. त्यावेळी आमच्या घरी लाईट होती. हे म्हणणे खरे आहे की त्या लाईटच्या उजेडात आमचे घरामध्ये जिन्यातले व घरातील तसेच आजुबाजुचे स्पष्ट दिसते. हे म्हणणे खरे आहे की मला आता दाखविण्यात आलेल्या आर्टीकल 'इ'च्या फोटोमध्ये एक टावेल, एक चप्पल व एक कागद दिसत आहे. आरोपीचे विधीज्ञांनी सदर फोटो उलटतपासणीमध्ये साक्षीदारास दाखवुन त्याकडे लक्ष वेधल्यामुळे सदर फोटोस निशाणी क्र.**४५** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की घटनेच्या दिवशी सकाळी ०७.१५ ते ०७.३० वाजता पोलीस आमच्या घरी आले होते. हे म्हणणे खरे आहे की माझा पुतण्या बापुसाहेब जमदाडे यांनी पोलीसांना घटनेची माहीती दिली होती. मग पोलीसांनी त्याची नोंद त्याचे स्टेशन डायरीला घेतली होती.

११. हे म्हणणे खरे आहे की आमचे भाउबंद इतर जमदाडे कुटूंबीय सुध्दा आमच्या गावामध्ये राहतात. हे म्हणणे खरे नाही की आमच्या भावकीतील

लोकांनी अनिलला तात्काळ उतरवुन दवाखान्यात नेले नाही. हे म्हणणे खरे नाही की मला स्वत:ला अनिलला खाली उतरवुन दवाखान्यात न्यावे असे वाटले नाही. हे म्हणणे खरे आहे की पोलीस येईपर्यंत व प्रेत पंचनामा करेपर्यंत त्याची बॉडी तशीच लटकलेली होती. हे म्हणणे खरे आहे की मी स्वत: कोणत्याही डॉक्टरांनी फोन केला नाही. हे म्हणणे खरे आहे की घटनेच्या ठिकाणी पोलीस येईपर्यंत कोणताही डॉक्टर तेथे आले नव्हते.

१२. मला दिवस तारीख महिना कळतो. हे म्हणणे खरे आहे की माझे सरतपासणीतील 'लग्नानंतर अनिल त्याचे पत्नीसह कामखेडा येथेच आमच्या घरी परंतू स्वतंत्र खोलीत राहात होते. त्यांना दोन खोल्या स्वतंत्र राहण्यासाठी दिल्या होत्या. लग्न झाल्यापासून त्यांचे सतत आपसात भांडण होत होते. थोडे भांडण झाले तरी अर्चना तिच्या वडीलांना, मामाला फोन करायची व ते लगेच यायचे व ती माहेरी निघून जायची. मी व माझी पत्नी आणायला जायचो' हा मजकुर मी पोलीसांना फिर्याद देतांना सांगितला होता. सदरचा मजकुर पोलीसांनी माझे फिर्यादमध्ये जशाचा तसा लिहीला नाही याचे कारण मला सांगता येत नाही.

१३. हे म्हणणे खरे आहे की माझे सरतपासणीतील 'परंतू तिचे वडील म्हणाले की, आम्ही तिला पाठवत नाही. तुम्ही तिच्या मामाकडे जा' हा मजकुर पोलीसांना सांगितला होता. हे म्हणणे खरे आहे की माझे सरतपासणीतील '२ एकर शेती सुध्दा मुलाकडून तिने नावावर करून घेतली. तिने अनिलला त्या शेतात यायचे नाही असे सांगितले व मी माझे शेत पाहीन असे म्हणाली. त्यामुळे माझा मुलगा खचला. दिनांक १८/०६/२०२० रोजी दिवसभर माझा मुलगा मला दिसलाच नाही. मी रात्री लघुशंकेला अंदाजे ०१.०० वाजता उठलो असता स्लॅपच्या हुकला मुलगा लटकलेला दिसला. त्याने जिन्यावर चिठ्ठी लिहून ठेवलेली होती. पोलीस तेथे आले. त्यांनी ती चिठ्ठी जप्त केली. पोलीसांनी ती चिठ्ठी वाचून पाहिली होती. त्याने त्याच्या हातापायावर सुध्दा काही तरी लिहीलेले होते. पोलीसांनी सर्व फोटो काढले. त्यानंतर मी फिर्याद दाखल केली. माझे मुलाला त्याचे बायकोने खुप त्रास दिला. तिने माझे मुलाचे कपडे जाळले. तिच्या त्रासामुळे माझे मुलाने आत्महत्या केली' इत्यादी मजकुर पोलीसांना जबाब देतांना सांगितला होता. सदरचा मजकुर पोलीसांनी माझे फिर्यादमध्ये जशाचा तसा लिहीला नाही याचे कारण मला सांगता येत नाही.

१४. हे म्हणणे खरे आहे की मी पोलीसांकडे गेलो तेव्हा माझी मानसिक अवस्था निट नव्हती. हे म्हणणे खरे नाही की त्यानंतर मी पोलीसांकडे जावुन माझा जबाब बदलुन दिला होता. पोलीसांनी मला परत बोलावले होते व त्यांनी माझा जबाब घेतला होता.

१५. सचिन बहीर हे माझे मुलाचे मावस भाउ आहे व त्यांचे घर बीड इथे धांडेगल्लीमध्ये आहे. हे म्हणणे खरे नाही की बहीर घराण्याचा बीडमध्ये दबदबा आहे. हे म्हणणे खरे आहे की दगडु शंकरराव बहीर हे माझे मेव्हणे आहे. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी माझे समक्ष कोणतीही वस्तु जप्त केली नाही.

प्रश्न : पोलीसांनी तुमच्या समक्ष काय जप्त केले होते.

उत्तर : दोरी व चिठ्ठी.

१६. पोलीसांनी सदर वस्तु त्याच दिवशी जप्त केल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की मी स्वत: ती चिठ्ठी पोलीसांना दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की टावेल व चप्पल या गोष्टी पोलीसांनी माझे समक्ष जप्त केल्या नाही. साक्षीदार सांगतो की जे काही सामान होते ते पोलीसांनी जप्त केले होते.

१७. हे म्हणणे खरे आहे की आमच्या घराच्या समोर भाउकीतील घरी व मस्के यांचे घर तसेच शाळा वगैरे आहे. हे म्हणणे खरे आहे की आमच्या समोर टेकाडे वकील यांचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की ग्रामीण पोलीस ठाणे येथील बीट अंमलदार श्री. जरे हे आहेत.

१८. हे म्हणणे खरे आहे की मी रात्री ०९.०० ते १०.०० वाजता झोपलो होतो. सदर दिवशी अनिल दिवस भर बाहेर होता व रात्री केव्हा आला हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की माझी व माझे भावाची शेती जवळ जवळ आहे. हे म्हणणे खरे आहे की माझी सुन अर्चना आमचे शेतात तसेच माझे भाउ बापुसाहेब जमदाडे यांचे शेतात काम करीत होती. अर्चना ही गावात राधाकृष्ण स्वयंसहायता समुह कामखेडा हा बचत गट चालवित होती व त्याची ती सचिव होती याची मला माहीती नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर घटनेच्या वेळी माझी मोठी नात अनिलची मुलगी अमृता ही चौथीमध्ये होती व

त्याची लहान मुलगी पहिलीत होती. हे म्हणणे खरे आहे की अर्चना हिचे दुसरे मुलीचा जन्म तिच्या माहेरी झाला होता.

**आरोपीचे विधीज्ञांचा तोंडी विनंती वरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती.

RENUKA MANIKRAO SATAV

Digitally signed by RENUKA MANIKRAO SATAV
Date: 2026.03.31 11:38:04 +0530

**( रेणूका मा. सातव )**

दिनांक : ३०/०३/२०२६ अतिरीक्त सत्र न्यायाधीश, बीड